१५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून पथ दिव्याची
वीज देयक आणि पाणी पुरवठा योजनांची वीज
देयके अदा करण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक-पंविआ-२०२१/प्रक्र-७१ /वित्त-४
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
दि. २३ जून, २०२१

संदर्भ - १. शासन निर्णय क्र. पंविआ-२०२०/प्रक्र-५९ /वित्त-४, दि.२६.६.२०२०
२. शासन निर्णय क्र. पंविआ-२०२०/प्रक्र-५९ /वित्त-४, दि.४.१२.२०२०
३. केंद्र शासनाचे पत्र क्र.जी-३९०११/२/२०१७-एफडी, दि.५.८.२०२०

## परिपत्रक

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अबंधित (अनटाईड) आणि बंधित (टाईड) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणारा निधी खर्च करताना पंचायतराज संस्थानी पालन करावे याची मार्गदर्शक तत्वे, सूचना याबाबत ग्रामविकास विभागाने शासन निर्णय क्र. पंविआ-२०२०/प्रक्र-५९ /वित्त-४, दि.२६.६.२०२० निर्गमित केला आहे. तसेच केंद्र शासनाच्या क्र.जी-३९०११/२/२०१७-एफडी, दि.५.८.२०२० च्या पत्रान्वये अतिरिक्त निकष व संनियंत्रण संबंधित मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने शासन निर्णय क्र. पविआ-२०२०/ प्र.क्र.५९/वित्त-४, दि.४ डिसेंबर, २०२० निर्गमित करण्यात आला आहे.

अबंधित (अनटाईड) अनुदानातून घेतल्या जाणा-या कामे / उपक्रमामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

वादळ पाण्याचा निचरा आणि पाण्याचा साठा व्यवस्थापन, मुलांचे लसीकरण ( रोग,संसर्ग इ. पासूनसुरक्षितता ) मुलांचे कुपोषण रोखणे, ग्रामपंचायतींदरम्यानचे जोडरस्ते आणि ग्रामपंचायतींच्या अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल आणि स्मशानभूमीचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल, स्मशानभूमीसाठी जमीन अधिग्रहण आणि मृत शरीर दफनभूमीची देखभाल, एलईडी पथदिवे व सौर पथदिव्यांचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल (सौर पथदिवे “वैयक्तिक खांब आधारीत प्रणाली” किंवा “केंद्रिकृत सौर पॅनेल प्रणाली” असू शकते) ग्रामपंचायतीमध्ये पुरेशी व उच्च बँडविडथसह वाय-फाय डिजीटल नेटवर्क सेवा उपलब्ध करणे, सार्वजनिक वाचनालय, मुलांसाठी उद्याने तसेच इतर मनोरंजन सुविधा, खेळाचे मैदान, क्रिडा व शारीरिक फिटनेस उपकरणे, ग्रामीण बाजारहाट इ. राज्य कायदयानुसार राज्य शासनाने केलेल्या इतर मूलभूत सुधारित / वर्धित सेवा, तसेच वीज, पाणी, कच-याचे संकलन व विल्हेवाट, सुका व ओला कचरा व्यवस्थापन उपकरणे, कंत्राटी तत्वावर (आऊटसोर्सिंग) मनुष्यबळ यांसाठी होणरा आवर्ती खर्च आणि इतर आवश्यक प्रशासकीय खर्च, नैसर्गिक आपत्ती, साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावावेळी त्वरीत मदतकार्य, पंचायतींना देण्यात आलेल्या इतर जबाबदा-यांची अंमलबजावणी जसे की, जैवविविधता अधिनियम २००२ अंतर्गत लोकांची जैवविविधता नोंदवही ( PBR - Peoples Biodiversity Register ) तयार करणे व अद्ययावत करणे.

Scanned with CamScanner

सध्या राज्यात कोरोना परिस्थिती पाहता ग्रामीण भागात आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. आरोग्य यंत्रणा वीजेअभावी उपकरणांचा वापर करू शकत नाही. ग्रामीण भागात पथ दिव्यांची आणि पाणी पुरवठा प्रकल्प योजनेची विद्युत देयके अदा न केल्याने विकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सद्य परिस्थिती पहाता पंधराव्या वित्त आयोगाच्या अबंधित अनुदान (untied) अनुदानातुन पथ दिव्याची देयके आणि बंधित (Tied) अनुदानातुन पाणी पुरवठा योजनांची विद्युत देयके अदा करण्यास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. सर्व प्रथम पथ दिव्यांची विद्युत देयके आणि पाणी पुरवठा योजनांची विद्युत देयके अदा करून १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या बंधित आणि अबंधित निधीतून इतर खर्च नंतर करावा.
२. ग्रामपंचायतीने लवकरात लवकर सौर उर्जेवर भर देऊन त्याचा वापर करण्यास प्राधान्य दयावे. जेणेकरून भविष्यामध्ये विद्युत देयकांची रक्कम कमी होईल.
३. व्यवस्थित लेखांकन होण्याच्या दृष्टीने व घटनात्मक दुरूस्तीच्या अनुषंगाने त्या त्या ग्रामपंचायतीने १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या अबंधित अनुदानातून (अनटाइड) पथ दिव्यांची वीज देयके आणि बंधित अनुदानातून (टाइड) पाणी पुरवठा योजनांची वीज देयके ग्रामपंचायत स्तरावरच अदा केली जाईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२१०६२३१६११३४७५२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pravin Jain

(प्रविण देविचंद जैन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रती,

१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
३. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
५. गट विकास अधिकारी (सर्व) (संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या मार्फत),
६. सर्व सरपंच
७. सर्व ग्रामसेवक

Scanned with CamScanner